शोधप्रबंधाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्‌यापीठ नांदेड

मानव विज्ञान विद्‌याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील

पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

"मराठवाडयाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाची भूमिका"

(2010-2011 ते 2019-2020)

विषय : अर्थशास्त्र

संशोधक

मनिषा महादेव मस्के

मार्गदर्शक

डॉ. रत्नाकर रामराव कांबळे

अर्थशास्त्र विभाग, शारदा महाविद्‌यालय, परभणी.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

सप्टेंबर-2022

1	प्रस्तावना (Introduction)	03
2	संशोधनाची गृहितके (Hypothesis of The study)	05
3	संशोधनाचे महत्व (Importance of The Study)	06
4	संशोधन पध्दती (Research Methodology)	07
अ	नमुना निवड (Sampling Method)	07
ब	अ प्राथमिक साधनसामग्री (Primary Data)	07
क	ब दुयम साधन सामुग्री (Secondary Data)	07
5	संशोधन विषयाचे निवड (Selection of research topic)	07
6	संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा (Scope & Limitation of the study)	08
7	संशोधन प्रबंधाचा संकल्पित आराखडा (A conceptuial outline of a Research Thesis)	08
8	संदर्भ सुची (References)	10

प्रस्तावना (Introduction) :-

भारत हा कृषिप्रधान देश आहे. एकुण लोकसंख्येपैकी 72.2 टक्के लोकसंख्या हया ग्रामीण भागात राहतात आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या ही सर्व शेतीदर अवलंबुन असते. आज आपण पहात आहोत. जागतिकीकरण उदारीकरणे, औषध खेते, शेतीमालाच्या किंमतीत चढ-उतार तसेच अवजारांच्या वाढत्या किमती व हवामानातील बदल या सर्व कारणांमुळे शेती व्यवसाय तोटयात जात असल्याचे दिसुन येते, लोकसंख्यावाढ ही एवढया झापाटयाने वाढत चाललेली दिसुन येत आहे, त्यामुळे शेतीवर जास्त भार येत असल्याचे दिसुन येते, हया कारणामुळे लहान व श्रीमंत शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होताना दिसून येते.

लहान शेती असल्यामुळे शेतकऱ्यांना पाहिले तेवढे उत्पन्न मिळत नाही व यामुळे अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते व हयाचा परिणाम हा अर्थव्यवस्थेवर दिसुन येतो. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून कृषी पर्यटन शेतकऱ्यांनी सुरु केले, तर शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते. कृषी पर्यटनामुळे ग्रामीण विकास व ग्रामीण विकासातुन देशाचा विकास साध्य होतो. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देते, ग्रामीण भागांतील तरुणांना व महिलांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे कृषी पयर्सटनाच्या माध्यमातुन ग्रामीण भागातील जीवनमान उंचावते, कृषी पर्यटन हा पर्यटन उद्योगाचा एक विशिष्ट आणि उद्यान्मुख बाजार विभाग आहे. 2019 मध्ये जागतिक स्तरावर कृषी पर्यटन बाजाराचे मूल्य $ 42.46 अब्ज होते. भारतात कृषी पर्यटनातून बमळणारा महसूल 20 टक्के वार्षिक वाढ दराने आहे. त्यामुळे कृषी पर्यटन उद्योगात स्थान मिळाले आहे.

शहरी माणसाला गावकडाच्या मातीची ओढ आहे. तर ग्रामीण भागात शेतीपुरक व्यवसायाची गरज आहे. हया दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन सन 2004 मध्ये बारामतीपासून सुरु झालेल्या कृषी पर्यटनाने संपूर्ण देशभरात व्याप्ती निर्माण केलेली असल्याचे दिसून येते. भारतात कृषी पर्यटन सुरु करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. आज मित्तिस 400 पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्र अस्तित्वात असुन रुपये 18 कोटीचे अतिरिक्त उत्पन्न कृषी पर्यटन केंद्र चालवणाऱ्यांना मिळाले आहे.

कृषी पर्यटन म्हणजे कृषी व पर्यटन या दोन विभागात समन्वय आहे. येथे पर्यटक शेतांना भेट देतील शेतीच्या विविध पैलुंचे दर्शन व अनुभव घेतील ताजा भाजीपाला, फळे खरेदी करु शकतील प्रदुषण मुक्त वातावरणाचा आनंद घेऊ शकतील. ग्रामीण भागातील तसेच जागरण, गोंधळ, भारुड, कीर्तन, प्रवचन

अशा पारंपारीक लोकसंलाचा अनुभव व आनंद घेऊ शकतात. तसेच कृषी प्रक्रिया केंद्र, हरित गृह, नर्सरी, इमू पालन, कुक्कुट पालन, शेळी मेंढी पालन, देशी व विदेशी गायीचे संवर्धन सेंद्रीय शेती यासारख्या प्रकल्प पर्यटकांना ज्ञान होतात. ग्रामीण भागातील लोकांना तयार केलेल्या वस्तुना ग्राहक मिळाल्यामुळे रोजगारांची संधी उपलब्ध होते व बचत गटांना सुध्दा बाजारपेठ तयार झालेली दिसुन येते. वाढीव खर्च, हवामानातील बदल, जमिनीचे तुकडे होणे इत्यांदीमुळे भारताची शेती तणावाखाली आहे. शेती हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असला तरी पर्यायी उपजीविका आणि उत्पन्नातील विविधतेच्या शोधात शेतकरी इतर उद्योगाकडे वळले आहे. कृषी पयर्सटन ग्रामीण अधोगतीचा परिणाम दूर करु शकतो आणि शेतकऱ्यांच्या कृषी आणि परिसंस्था अधारीत सेवांवरील विश्वास पुनर्निश्चित करु शकते.

महाराष्ट्र मध्ये कृषी पर्यटनाची संख्या 400 पेक्षा जास्त असल्याचे दिसुन येते. महराठवाडयामध्ये कृषी पर्यटनाची संख्या 12 असल्याचे दिसुन येते ती पुढील प्रमाणे.

अनुक्रमांक	जिल्हा	कृषी पर्यटन केंद्राची संख्या
01	नांदेड	01
02	परभणी	01
03	जालना	01
04	औरंगाबाद	04
05	हिंगोली	00
06	लातूर	02
07	उस्मानाबाद	01
08	बीड	02

महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटनाच्या क्षेत्रात अग्रेसर असून, कृषी पर्यटन वाढीसाठी (ATDC-Agri Tourism Development Corporation (2005) & (MART- Maharashtra State Agri & Rural Toursm Co-opertion Federation Ltd) या संस्था कायर्सरत आहेत हया पर्यटन केंद्रामुळे पर्यटनाची संख्याही वाढलेली दिसुन येते कृषी पर्यटनामुळे ग्रामीण विकास होण्यास मदत होते. त्यामुळै आर्थिक विकास हा कृषी पर्यटनामुळे मराठवाडा विभागाचा कशा पध्दतीने होतो व त्याची भुमिका कशा पध्दतीने आहे ते पाहता येते.

<u>संशोधनाची उदिष्टे (Objectives of Study) :-</u>

1. कृषी पर्यटन संकल्पना अभ्यासणे.
2. मराठवाडयाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाची भूमिका अभ्यासणे.
3. मराठवाडयातील कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
4. कृषी पर्यनासमोर येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
5. कृषी पर्यटनाच्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
6. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना निर्माण होणाऱ्या संधी अभ्यासणे.

<u>संशोधनाची गृहितके (Hypothesis of Study) :-</u>

1. मराठवाडयातील कृषी पर्यटन समोर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.
2. कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील तरुण व महिलांच्या स्थितीत सुधारणा झाली आहे.
3. विविध शासकीय योजना मुळे कृषी पर्यटनाच्या संख्या ही वाढत असल्याचे दिसुन येते.
4. कृषी पयर्टनामुळे ग्रामीण भागाचा आर्थिक व सामाजिक विकास झाला आहे.
5. कृषी पसर्यटनामुळे शेतकऱ्यांना व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत.

संशोधनाचे महत्व : (Importance of the Study)

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे शेतीवर जास्त प्रमाणावर अवलंबुन असल्याचे दिसुन येते. कृषी हा भारतीय अर्थव्यव्थेचा कणा आहे. भारताच्या जीडीपीच्या जवळपास 26 टक्के शेतीतून येते. 0.625 दशलक्ष खेडयांमध्ये 110 दशलक्ष शेतकरी रहातात आणि 350 मॅट्रीक टन पेक्षा जास्त अन्नधानय देशाला पुरवतात. 2017 मध्ये पर्यटनामुळे थेट रोजगार 21.5 दशलक्ष निर्माण झाला. भारताला थेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या 11.26 दशलक्ष होती, जागतिक पर्यटन बाजारामध्ये भारताचा वाटा 1.75 टक्के होता. या वाटयाने 32000 कोटी रुपये परकीय चलन कवमले आहे. देशांतर्गत पर्यटक भेटी देतात आताच सरकारने काही महत्वाच्या क्षेत्राचा विकास केला आहे. जर शेती बरोबर एखादा पुरक व्यवसाय करीत असतील तर मिळणारे उपत्पन्न हे जास्त प्रमाणात मिळू शकते. कृषी पर्यटन शेतकऱ्यांना व ग्रामीण भागात एक प्रकारचे जिवमान उंचावण्यासाठी खुप महत्वाचे आहे. आज आपण पाहत आहोत शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढत आहे. शेतीचे विभाजन प्रमाण वाढवुन लहान श्रीमत शेतकऱ्यांचे प्रमाण झपाटयाने वाढत असल्याचे दिसुन येत आहे. बरोजगारीचे प्रमाण सुध्दा वाढत असल्याचे दिसुन येत आहे. यावर उपाय म्हणून कृषीपर्यटन उभारु शकतो.

प्रस्तुत संशोधनात मराठवाडयातील आर्थिक विकासात कृषी पर्यटनाची भूमिकेचा अभ्यास करण्यात येणार आहे. शासकीय धोरणे व योजना येत आहेत. याचा शेतकऱ्यांना लाभ होत असल्याचे दिसुन येतकृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना, तरुणांना व महिलांना रोजगार मिण्यास व त्याच आर्थिक विकास होण्यास मदत होते. अनेक समस्या बरोजगारीच्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या या कृषी पर्यटनामुळे सोडू शकताता. त्यामुळे ग्रामीण संस्कृती समाज जिवन अर्थव्यवस्था पर्यावरण यावर होणाऱ्या व चांगल्या व वाईट परिणामांचा अभ्यास करता येतो यामुळे मराठवाडा विभागातील आर्थिक विकास कृषी पर्यटनाच्या भूमिकेचा अभ्यास करणार असलयाचे प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाला महत्व आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology) :

नमुना निवड (Sampling Method) :

मराठवाडयातील आर्थिक विकासात कृषी पर्यटनाच्या भूमिकेचा अभ्यास या संशोधनासाठी नमुना निवड करतांना मराठवाडययातील औरंगाबाद परभणी, लातूर, हिंगोली, जालना, बीड, नांदेड, उस्मानाबाद जिल्हयातील प्रतिनिधिक ढोबळमानाने अभ्यास करण्यात येणार आहे. त्या कृषी पर्यटनापर्यंत पोहोचण्यासाठी वेळ, श्रम आणि पैसा याची मर्यादा पडते त्याचबरोबर लाभार्थी घटकापैकी 25 टक्के घटकाची या एच्छिक पध्दतीने निवड केली जाणार आहे. संशोधनाकरीता संशोधन पध्दती मध्ये दोन प्रकाराच्या संशोधन पध्दती करण्यात येणार आहेत यातुन मिळालेल्या माहितीवरुन संशोधन कार्य पुर्ण होणार आहे.

1) प्राथमिक साधन सामुग्री (Primary Data) :

कृषी पर्यटनामुळै मराठवाडयातील आर्थिक विकासात कशा पध्दतीने विकास होतो हे कृषी पर्यटनातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष घटकाची मुलाखत घेऊन कृषी पर्यअनामुळे तरुण व महिलांना रोजगारांच्या संधी शेती उत्पादनाना बाजारपेठ उपलब्ध, शासकीय योजनांचा लाभ, ग्रामीण विकास इत्यादी माहिती संकलित करण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखत ही प्राथमिक साधनसामुग्री पध्दत वापरण्यात येणार आहे.

2) दुय्यम साधन सामग्री (Secondary Data) :

मराठवाडययातील आर्थिक विकासात कृषी पर्यटनाच्या भूमिकेचा अभ्यास या विषयावरील संशोधनासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानापत्र, शासकीय कागदतप्र, संशोधन अहवाला, विविध वेबसाईट, प्रोजेक्ट रिपोर्ट इत्यादी साधने वापरण्यात येते.

संशोधन विषयाची निवड (Selection of Research Topic) :

लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे वाढत चालल्याचे दिसुन येत आहेच याचा परिणाम हा अप्रतयक्षरित्या शेतीवर येत आहे. शेतकऱ्यांना उत्पन्नही शेतीतून जास्त प्रमाणात मिळत नाहीये त्यामुळे दारिद्रयाचे प्रमाणही वाढत चाललेले दिसुन येत आहे. हवामान बदल, कमी भांडवल, अवजाराच्या वाढत्या किमती, या सर्व समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे पण कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होताना दिसुन येत आहे. महिला व तरुणांना

सुध्दा रोजगार प्राप्त होत आहे. याचा सर्व प्रभाव हा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे दिसुन येते व अप्रत्यक्षरित्या देशाच्या उत्पानातसुध्दा वाढ होते त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी पर्यटन संकल्पनेचा अवलंब केला पाहिजे. विविध संर्दी साहित्य सर्वक्षण वाहणी करुन असे लक्षात येते की, हवामानातील बदलामुळे व काही मानवनिर्मित वृक्षतोड असो किंवा प्रदुषणामुळे पाऊस हा नियमित पडत नसुन याचा परिणाम हा शेतीवर होत असल्याचे दिसुन येते व त्यामतुळे पाण्याचा साठी हा कमी होत चालेला दिसुन येत आहे. जर आपण महाराष्ट्र कृषी पर्यटनाचा विचार केला तर महाराष्ट्रात कृषी पर्यटनही जास्त संख्येत उपलब्ध आहेत पंरतु मराठवाडयाच्या विचार केला तर आपणास 12 कृषी पर्यटन असल्याचे आढहले जर मराठवाडयात कृषी पर्याटनाची संख्या वाढली तर मराठवाडण्याच्या विकास होऊ शकतो त्यामुळे या संशोधनामुळे कृषी पर्यटनावर प्रकाश टाकला जाईलज व त्याद्‌वारे मराठवाडण्याच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटानाद्‌वारे साध्य होत आहे. त्यावर संशोधनाच्या माध्यमातुन विसतुत रित्या मराठपडयाच्या विकासाठी हे संशोधान उपलब्ध ठरेल.

संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती (Scope & Limitation of the Study)

प्रस्तुत संशोधन विषय हा मराठवाडा विभागातील कृषी पर्यटन कार्यक्षेत्र पुरताच मयादित आहे. तसेच ग्रामीण आर्थिक विकास कृशी पर्यटनामुळे कशाप्रकाशे साध्य होतो व त्याची भूमिका यापुरती मर्यादित आहे.

<u>संशोधन प्रबंधाचा संकल्पीत आराखडा (A Conceptual Outline of a Research Thesis) :</u>

<u>प्रकरण : 1</u>

<u>प्रसतावाना (Introduction)</u>

प्रस्तुत प्रकरण कृषी पर्यटन संकल्पनेचा आढावा घेण्यात येणार आहे व कृषी पर्यटन म्हणजे काय? त्याची व्याख्या स्वरुप व्याप्ती पाहाणार आहोत.

<u>प्रकरण : 2</u>

संशोधन पध्दतीव संशोधन विकासाचा आढावा.

<u>(Research Methodology & Research Subject) :</u>

प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यासाठी वापरण्यात येणारी संशोधन पध्दती, संशोधन विषय निवडीचे उद्देश, संशोधन विषयाची गृहीतके, संशोधनाचे महत्व साहित्याचा आढावा.

<u>प्रकरण : 3</u>

<u>महाराष्ट्र आणि महराठवाडयाच्या अर्थव्यस्थेचा (Study of Economy of Maharashtrai and Marathwada)</u>

महाराष्ट्राचे स्थान व क्षेत्र, महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग, महाराष्ट्रातील कृषी व्यवसाय, मराठवाडयाची भौगोलीक, ऐतिहासीक, सामाजिक, औद्योगिक आणि आर्थिक पार्श्वभूमी.

<u>प्रकरण : 4</u>

<u>कृषी पर्यटन व मराठवाडा (Agritourism and Marathwada) :</u>

प्रमुख कृषी पर्यटन स्थळे, मराठवाडयाचा

भौगोलीक, सांस्कृतीक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी, कृषी पर्यटनाला पायभूत सुविधा

<u>प्रकरण : 5</u>

मराठवाडयातील आर्थिक विकासात कृषी पर्यटनाची भूमिका

<u>(Economic Sevlopment in Marathwada the role of Torurism)</u>

ग्रामीण भागांच्या पायभूत सुविधा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत बदल, स्थानिक, महिला व तरुणांना रोजगाराची निर्मिती, मराठवाडयातील कृषी

पर्यटन येणाऱ्या समस्या, शासनाच्या विविध योजना, शहर व गाव हे दरी कमी करणे, कृषी, पर्यटनाच्या माध्यमातुन ग्रामीण जिवनमान उंचावणे, शेती उत्पादानांना बाजारपेठ मिळणे.

प्रकरण : 6

माहितीचे संख्याकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन (Statistical Analysis and Interpretation of Data)

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडा विभागातील निवडक कृती पर्यटनाची मुलाखतीच्या आधारे प्राप्त माहितीच्या आधारे आकडेवारी अर्थनिर्वचन केली जाईल.

प्रकरण :7

संशोधन निष्कर्ष आणि शिफारशी (Research findings and Recommendations) :

प्रस्तुत प्रकरणात मुलाखत आणि सुचीच्या माध्यामातुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षाची माहिती करण्यात येणार आहे. ग्रामीण विकासालत कृषी पर्यटनाची भूमिका स्थानिक महिला व तरुण रोजगार विविध उपाययोजना कृषी पर्यटन वाढीसाठी उपाय योजना

(टिप : वरील संशोधन आराखडा स्थुल स्वरुपात असुन प्रत्यक्ष संशोधनाचे कार्य करते वेळी त्यात बदल होण्याची शक्यता आहे)

संदर्भ ग्रंथसुची (References)

1. कठारे अनिल - मराठवाडयाचा इतिहास, एज्युकेशनल पब्लीकेशन.
2. प्राध्यापक के.एम. भोसले, प्राध्यापक के.बी. काटे - संशोधन पध्दती
3. साप्ताहिक सकाळ पयटन, विशेषांक पुणे.
4. डॉ. पी.एल. भांडारकर, सामाजिक संशोधन 1997, विद्या बुक्स, औरंगाबाद,
5. मनोज हाडवले, 'कृषी पर्यटन एक शेतीपुरक व्यवसाय' सकाळ प्रकाशन
6. नंदकिशोर किसनराव जोजारे, 'कृषी पर्यटन उद्योग' चेतक बुक्स
7. कृषी पर्यटन- गोडवा कृषी प्रकाशन
8. वर्तमानपत्रे
9. वेबसाईट
10. www.egritourism.in
11. www.indiatourism.net
12. www.maharashtratourism.gov.in
13. www.incredibleindia.org
14. www.thehindubusinessline.com

संशोधक विद्यार्थिनी
(मनिषा महादेव मस्के)

संशोधक मार्गदर्शक
(प्रा.डॉ. रत्नाकर आर. कांबळे)